## ऋणनिर्देश

शोध-निबंधाचे काम म्हणजे एखाद्या विषयावर वर्षभर केलेले अभ्यासपूर्ण चिंतन होय. विव्दान लोकांचे मार्गदर्शन, संशोधकाची चिकाटी व सततचा प्रयत्न यावरच शोध-निबंधाचे यश अवलंबून असते. यासाठी अनेकांचे सहकार्य घ्यावे लागते अर्थात त्यांचा ऋणनिर्देश करणे नैतिक कर्तव्य ठरते.

या शोध कार्यासाठी सतत मार्गदर्शन करणाऱ्या, आपल्या वैयक्तिक व घरगुती अडचणी दूर सारुन संशोधन कार्यास दिशा व साचेबंदपणा देण्याचे महत्वाचे काम करणाऱ्या मार्गदर्शक प्रा.डॉ.सुमन रा.पाटील यांचे अनमोल सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करण्याऐवजी ऋणातच राहणे योग्य वाटते.

प्रा.डॉ.ल.रा.नसिराबादकर, प्रा.डॉ.वि.रा.तोडकर, प्रा.डॉ.एस्.ए. भोसले ( पुणे विद्यापीठ ), मा.आर.के.कणबरकर,(माजी कुलगुरु,शिवाजी विद्यापीठ ) प्रा. मा.के.यादव, प्रा.व्ही.बी.जोशी इ. विव्दानांशी वेळोवेळी झालेल्या चर्चा व लाभलेले मार्गदर्शन तितकेच मोलाचे आहे. आमच्या संस्थेचे मानद सचिव ॲड.बी.एस्.पाटील, प्राचार्य एल्.जी.दाभोळे, प्रा.आर.वाय्. कणसे यांची प्रेरणा व सहानुभूती मिळाल्याने शोध कार्यास गती मिळाली.

जयकर ग्रंथालय, पुणे ; बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर ; विश्रामबाग-वाडा शासकीय ग्रंथालय, पुणे; केसरी-मराठा कार्यालय, पुणे; नगरपालिका ग्रंथालय, कराड ; तसेच स.गा.म.कॉलेज,ग्रंथालय,कराड; क.मा.पाटील कॉलेज ग्रंथालय,इस्लामपूर; वि.ना.कॉलेज ग्रंथालय,शिराळा; वाय्.सी.कॉलेज ग्रंथालय, इस्लामपूर इत्यादी ग्रंथालयांचा मी ऋणी आहे.

शोध-निबंधातील सुबक टंकलेखन करणारे श्री बाळकृष्ण रा.सावंत,कोल्हापूर यांचा मी आभारी आहे.

..

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | भूमिका | १-३ |
| प्रकरण पहिले | - जोतिराव फुले - चरित्र आणि कार्य | ४-३२ |
| प्रकरण दुसरे | - जोतिराव फुल्यांची काव्यसंपदा | ३३-५८ |
| प्रकरण तिसरे | - "अखंडादि काव्या"तील विषय वैविध्य | ५९-११८ |
| प्रकरण चौथे | - "अखंडादि काव्या"तील विचार आणि काव्यसौंदर्य | ११९-१५० |
| प्रकरण पाचवे | - उपसंहार | १५१-१६१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १६२-१६६ |


••

# भू मि का

# * भूमिका *

एकोणिसाव्या शतकातील कालखंड राजकीय स्थित्यंतर आणि सर्वांगीण संक्रमणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. तत्कालीन समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण रुढ होते. परंपरेनुसार ब्राह्मणांकडे अध्ययन अध्यापन व धार्मिक विधींचे काम सोपविले होते. त्यांनी आयुष्यभर अध्ययन, अध्यापन केल्याने ब्राह्मणसमाजास सर्व लोकांमध्ये साक्षर व विव्दान समजले जात होते. त्यांच्या दृष्टीने इतर सर्व वर्ण हीन, अज्ञ, होते. अर्थातच पेशवाईत विद्वान समजल्या जाणाऱ्या उच्चवर्णीयांना मानाचे स्थान होते त्यांना आदराने व सन्मानाने वागविले जात होते. समाजातील सर्व अज्ञ-जनांचा त्यांनी गैर फायदा घेतला व आपणांस पोषक असे धर्मग्रंथ आचारसंहिता तयार करुन धर्माच्या नावाखाली सामान्यांना लुबाडले.

पेशवाईत त्यांना मोठमोठ्या दक्षिणा दिल्या जात होत्या. शनिवारवाड्यात कित्येकदिवस ब्राह्मणांसाठी दानधर्म म्हणून पंचपक्वांनाची भोजने दिली जात. या उच्चवर्णीयांना यथेच्छ जेवण देणे पवित्र व पुण्य कर्म समजले जात असे. पर्वतीच्या पायथ्याशी उच्चवर्णीयांना दक्षिणेच्या स्वरुपात हजारो रुपये वाटले जात अर्थातच पेशवाईत ब्राह्मणांचे वर्चस्व पराकोटीला जाऊन पोहोचले होते. सर्वसामान्य समाजास धर्माच्या नावाखाली भूलथापा देवून लयलूट करण्याची सुवर्णसंधी त्यांना लाभली होती. उच्चवर्णीयांनी सर्व समाजास अज्ञानाच्या अंधारात ठेवून आपले दास बनविले. रावबाजीच्या पेशवाईत सर्वत्र अनागोंदी कारभार चालला होता. स्वत: पेशवा बदफैली स्त्रियांच्या घोळक्यातून वावरत होता. पेशवाईतील नीतिमत्ता रसातळाला गेली होती.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि इंग्रजांचा 'युनियन जॅक' शनिवारवाड्यावर फडकला. उच्चवर्णीयांनी या राजकीय स्थित्यंतराबरोबर भराभर 'इंग्रजीभाषेचा' अभ्यास करुन आंग्लाईत विव्दत्तेच्या सामर्थ्यावर उच्चधिकाराच्या जागा पटकाविल्या. अर्थात पेशवाईतील उच्चवर्णीयांची पुरोहितशाही व आंग्लाईतील अधिकारशाहीच्या सामर्थ्यावर त्यांनी समाजातील सर्वसामान्य शुद्रातिशुद्रांना

कायम स्वरुपाचे गुलाम बनविले. सामान्यजनांचा किरकोळ कारणावरुन अमानवी छळ केला जात होता अशा प्रतिकूल परिस्थितीत बाळशास्त्री जांभेकर, बाबा पद्मनजी, भाऊ महाजन, विष्णुबुवा ब्रह्मचारी, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी जोतिराव फुले, न्या. रानडे, आगरकरांसारखे महाराष्ट्राचे शिल्पकार उदयास आले. या पैकी जोतिराव फुल्यांनी शूद्रातिशूद्रांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. जोतिरावांचे ते एक जीवनध्येयच होते. यासाठी पुणे-ठाणे-मुंबई-बडोदा येथे सभा व्याख्याने देऊन धैर्याने समाज-प्रबोधनास प्रारंभ केला. त्यांचे हे कार्य म्हणजे वर्णवर्चस्वाविरुध्द एक ऐतिहासिक लढा होता. सर्वप्रथम त्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. कारण विद्या हे एक महान अस्त्र आहे. अविद्येचे अनर्थ सांगताना फुले म्हणतात :--

विद्येविना मति गेली मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली गतीविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

जोतिरावांनी मांडलेले हे एक महान तत्वच होय. सर्व समाज साक्षर झाल्याशिवाय समाजप्रबोधन होणार नाही असा ठाम विश्वास जोतिराव फुले यांना होता. त्यांनी अनंत, असंख्य अडचणींना तोंड देत स्त्रियां व शूद्रांसाठी हजारो-वर्षे बंद असणारे शिक्षणाचे दरवाजे खुले केले. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अविरत प्रयत्न केले. बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करुन बालसंहार थांबविला. सर्व समाजास अखंडादि काव्याद्वारे सत्याचरणाचे धडे दिले, मरेपर्यन्त शूद्रांच्या उध्दारासाठी व समाजात समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व प्रस्थापित करण्यासाठी झटले पण त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन तीन दशकातच फुल्यांच्या मूलगामी विचारांचा पाठपुरावा न केल्यामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील बहुजन समाजाची पकड ढिली झाली आहे. कर्त्या, शहाण्यामाणसांची उणीव भासत आहे.

एकोणिसाव्या शतकात समाजाच्या सर्वच थरातील म. जोतिबा फुल्यांच्या विचारावर निष्ठा असणाऱ्या कर्त्या माणसांनी जे अथक कष्ट उपसले त्यांची जाणीव ठेवून महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणापासून फुल्यांच्या विचारावर अधिक भर दिला

गेला तर पुन्हा एकदा समाजात नवचैतन्य उसळेल असा विश्वास वाटतो. त्या आत्मविश्वासानेच म.जोतिबा फुल्यांच्या `अखंडा` चा अभ्यास शोध निबंधासाठी सुरु केला आणि आमच्या शक्तीनुसार या विषयाचा पाठपुरावा करुन हा शोध निबंध विद्यापीठास सादर करीत असताना नवचैतन्याची एक लहर आम्हांलाही जाणवली.

स्थळ - इस्लामपूर -

ता. : : :१९८८

(प्रा.विजय बा.गायकवाड )

..